पोलीस उप आयुक्त, वाहतुक  नवी मुंबई
दिनांक ०१/०१/२०२३

# प्रेस नोट

## वाहतुक नियंत्रण विभाग, नवी मुंबई

**नवी मुंबई पोलीस आयुक्तालय परिसरात ३१ डिसेंबर २०२२ चे बंदोबस्ताचे वेळी वाहतुकीचे नियम न पाळणा—या वाहन चालकांविरुध्दच्या कारवाई बाबत**

दि. ३१ डिसेंबर २०२२ निमीत्त वाहतुक विभागाकडुन लावण्यात आलेल्या बंदोबस्ताचे वेळी मा.पोलीस आयुक्त, नवी मुंबई, मा.पोलीस सह आयुक्त, नवी मुंबई, मा.पोलीस उप आयुक्त वाहतुक विभाग, सहा.पोलीस आयुक्त, वाहतुक विभाग यांचे मार्गदर्शनाखाली वाहतुकीचे नियम न पाळणा—या वाहन चालकांवर तसेच मद्यप्राशन करुन वाहन चालविणा—या वाहन चालकांवर कारवाई करण्यात आली.

**सदर बंदोबस्ताचेवेळी विशेष मोहिम राबवुन, नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील १६ वाहतुक शाखांकडुन विना हेल्मेट वाहन चालविणा—या — ४८९, सिटबेल्ट न लावलेल्या — १३५ सिग्नल जंप केलेल्या— ६७ व इतर — १५२९ अशा एकुण २२२० वाहन चालकांवर तसेच १६० वाहन चालकांवर ड्रंक ॲण्ड ड्राईव्ह अन्वये कारवाई करण्यात आली.**

तसेच यापुढेही वाहतुकीच्या नियमांची पायमल्ली करुन बेजबाबदारपणे वाहन चालविणा—या वाहन चालकांवर वेळोवेळी वाहतुक विभागाकडुन कारवाई करण्यात येणार आहे. त्यामुळे वाहन चालकांनी वाहतुकीच्या नियमांचे पालन करावे. व वाहतुक सुरळीत ठेवण्यात नवी मुंबई वाहतुक विभागास सहकार्य करावे.

प्रति,
मा. संपादक, ——————————

२/— कृपया जनतेच्या माहितीकरीता प्रस्तुत प्रेस नोटला आपल्या वृत्तपत्रास प्रसिध्दी देण्यास विनंती.